C/29

# महाराष्ट्र शासन राजपत्र

# असाधारण भाग चार – ब

वर्ष २, अंक ३९] शुक्रवार, जुलै २३, २०१०/श्रावण १, शके १९३२ [पृष्ठे ७

किंमत : रुपये २८.००

असाधारण क्रमांक ९९

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**कृषी, पशुसंवर्धन, दुग्ध विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ जुलै २०१०

आदेश

**महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम, १९८३.**

क्रमांक अेजीयू. २०१०/प्र.क्र.७१/७-अे.— महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ (१९८३ चा महा.४१) याच्या कलम १७ च्या पोट-कलम (२ क) च्या खंड (ड) द्वारे, प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, कुलपतीशी विचारविनिमय करून याद्वारे असे विनिर्दिष्ट करण्यात येत आहे की, कुलगुरु पदाच्या नियुक्तीसाठी समितीने शिफारस केलेली व्यक्ती ही यासोबत जोडलेल्या अनुसूचीच्या भाग "अ" मध्ये, घालून दिलेल्या आवश्यक अर्हता व अनुभव आणि उक्त अनुसूचीच्या अनुक्रमे भाग "ब" व भाग "क" मध्ये घालून दिलेला इष्ट अनुभव, अपेक्षित कौशल्य आणि क्षमता धारण करणारी असेल.

## अनुसूची

### भाग-अ

**आवश्यक अर्हता व अनुभव.—**

(१) कृषि क्षेत्रातील किंवा संबंधित क्षेत्रातील डॉक्टरेट .

(२) कृषि क्षेत्रातील किंवा संबंधित क्षेत्रातील अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यामधील २० वर्षांचा अनुभव.

(३) प्रशासकीय आणि तंत्र क्षेत्रातील किमान ८ वर्षांचा अनुभव आणि प्राध्यापक किंवा समकक्ष पदापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या पदावरील ८ वर्षांचा अनुभव.

(४) पीएच. डी. नंतर किमान ५ संशोधन पेपर मान्यता प्राप्त अशा संशोधन जर्नल्समध्ये प्रकाशित केलेले असावेत आणि / किंवा मान्यताप्राप्त विद्याशाखेतील गुणात्मक दर्जा असलेली व राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय पातळीवर उच्च शिक्षणासाठी संदर्भग्रंथ म्हणून वापरली जातील अशी पुस्तके प्रकाशित केलेली असावीत.

(५) महत्त्वपूर्ण अशा किमान एका संशोधन प्रकल्पाचे संचलन केलेले असावे.

(६) आंतरराष्ट्रीय संस्था किंवा संघटना यांच्या देशाबाहेरील कार्यशाळा, चर्चासत्र (सेमिनार्स) किंवा परिषदांमध्ये सहभागात्मक स्वरूपाच्या कार्याचा अनुभव असावा.

(७) कृषी क्षेत्राशी संबंधित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्यशाळा, चर्चासत्र (सेमिनार्स), परिषदा यांचे देशात आयोजन करण्याचा अनुभव असावा.

(८) नेतृत्वाचा प्रात्यक्षिक अनुभव असावा.

### भाग-ब

**इष्टतम अनुभव.—**

(१) विद्यापीठाच्या अभ्यास मंडळ, विद्या परिषद, कार्यकारी परिषद (व्यवस्थापन मंडळ) यासारख्या सांविधिक प्राधिकरणावरील कार्याचा अनुभव असावा.

(२) दर्जात्मक बाबी, मूल्यनिर्धारण, अधिस्वीकृती प्रक्रिया इत्यादी हाताळण्याचा प्रत्यक्ष अनुभव असावा.

(३) पीएच. डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा अनुभव असावा.

(४) महाराष्ट्र कृषी विद्यापीठ अधिनियम, १९८३ मध्ये उद्दिष्ट ठेवल्याप्रमाणे विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व त्यांना दर्जेदार विद्यालयक्षेत्र पुरविण्यासाठी राज्य किंवा राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील विद्यार्थीकेंद्रित कार्यक्रमासारखा युवक विकास कार्यक्रम राबविण्याचा अनुभव असावा.

## भाग-क

**अपेक्षित कौशल्य व क्षमता.—**

१. **तंत्रविषयक कौशल्य.—** (१) तंत्रज्ञानाचा खुलेपणाने अंगिकार करणे आणि त्या तंत्रज्ञानाच्या ज्ञानाधारीत उपयुक्ततेबाबत दृढ विश्वास असावा.

(२) तंत्रज्ञानाच्या वापराबाबत उच्च पातळीवरील हातोटी.

२. **व्यवस्थापकीय कौशल्य.—** (१) अपेक्षित घटना व समस्यांवर मात करण्याची व त्यासाठी आगाऊ डावपेचात्मक आराखडा तयार करण्याची योग्यता असावी ;

(२) साधन संपत्तीची निर्मिती व त्यांचे योग्यप्रकारे नियत वाटप करण्याची क्षमता असावी ;

(३) दबावाखाली परिणामकारकपणे काम करण्याची आणि कामाचे व्यवस्थापन व उपलब्ध साधन संपत्तीचा कालमर्यादेत वापर करण्याची क्षमता असावी ;

(४) महसूल निर्मिती, नियोजन व वित्तीय नियंत्रण यासह वित्तीय व्यवस्थापनाचे प्रगल्भ ज्ञान असावे.

३. **कॉर्पोरेट उद्दिष्टे आणि राज्य तसेच राष्ट्रीय पातळीवरील प्राध्याने यामध्ये सुसूत्रता आणणे.—**

(१) महत्त्वाच्या क्षेत्रामधील समाजाच्या गरजा ओळखण्याची क्षमता असावी ;

(२) राष्ट्रापुढे असलेल्या आव्हानांचे सखोल ज्ञान असावे आणि विकासात्मक गरजांना उच्च शिक्षण कसे प्रतिसाद देऊ शकेल याबाबतचे ज्ञान असावे ;

(३) अभ्यासक्रमात विकासाबाबत या मुद्यांची, विशेषतः सहभाग आणि सामाजिक अंतर्भाव विस्तृतपणे वाढविणारे अभ्यासक्रम यांची विशेष जाण असावी ;

४. **नेतृत्व कौशल्य.—** (१) विविध लाभार्थी गटांना उद्युक्त करण्याची अपवादात्मक क्षमता असावी ;

(२) संघटनेचे ध्येय व उदिष्टे पुढे नेण्यीच प्रबळ इच्छाशक्ती असावी ;

(३) डावपेचात्मकदृष्ट्या, सूजनात्मकदृष्ट्या व स्थूलमानाने विचार करण्याची क्षमता असावी ;

(४) स्वउदाहरणाने नवीन कल्पनांचा अंगीकार करण्याची आणि संवादात्मक दृष्टीकोनातून त्या राबविण्याची क्षमता असावी ;

५. **संवादात्मक व सहकार्यात्मक कौशल्य.—** (१) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीयस्तरावर परस्पर सहकार्याच्या विकासामध्ये व अंमलबजावणीमध्ये उल्लेखनीय यश मिळालेले असावे ;

(२) वरिष्ठस्तरावर आणि मोठ्या व्यासपीठावर तसेच वैयक्तिक पातळीवर सखोल ज्ञानाच्या आधारे परिणामकारकपणे संवाद साधण्याची आणि मतपरिवर्तन करण्याची क्षमता असावी ;

(३) समयोचित क्षेत्रातील व्यावसायिक संस्था व संघटना यांचे सक्रीय सदस्यत्व असल्याचा पुरावा असावा ;

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ना. बा. पाटील,**
शासनाचे अपर मुख्य सचिव.

## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 21st July 2010

**Order**

MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES (KRISHI VIDYAPEETHS) ACT, 1983.

No.AGU. 2010/C.R.71/7-A.— In exercise of the powers conferred by clause (*d*) of sub-section (*2C*) of section 17 of the Maharashtra Agriculture Universities (Krishi Vidyapeeths) Act, 1983 (Mah.XLI of 1983) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, in consultation with the Chancellor, hereby specified that the person being recommended by the Committee for appointment as Vice-Chancellor shall possess the essential qualifications and experience as set out in Part 'A' of the Schedule appended hereto and desirable experience, expected skill and competency set out in Part 'B' and Part 'C' respectively of the said Schedule.

*Schedule*

PART 'A'

**Essential Qualification and Experience.—**

1. Earned Doctor of Philosophy (Ph.D.) in Agriculture or related fields.
2. Experience of 20 years in teaching, research and extension education in Agriculture or related fields.
3. At least 8 years of experience in the administration and technical field and 8 years of experience on the post not below the rank of Professor or equivalent post.
4. Minimum of five research publications in peer-reviewed/referred international research journals after Ph.D. and/or published quality books in a recognised discipline, referenced for study in higher education at the National/International level.
5. Execution of at least one major research project.
6. Experience of working with international bodies or international exposure through participation in workshops, seminars or conferences held outside the country.

7. Experience of organizing events such as workshops, seminars, conference at an International level within the country in the field of agriculture.

8. Demonstrated experience in leadership.

PART 'B'

**Desirable Experience.—**

1. Experience of working on the Statutory Authorities of a university such as Board of Studies, Academic Council, Executive Council (Board of Management).

2. Demonstrable Experience of handling quality issues, assessment and accreditation procedures, etc.

3. Experience to Ph.D. students.

4. Experience at the State or National or International level in handling youth development work such as organising student centric activities for their all-round development and for providing them rich campus life as envisaged in the Maharashtra Agricultural Universities (Krishi Vidyapeeths) Act, 1983.

PART 'C'

**Desired Skills and Competencies.—**

1. *Technical Skills.*—(1) Openness towards technology and a deep conviction regarding its potential applications in a knowledge-based settings ;

(2) Reasonable high level of comfort in the use of technology.

2. *Managerial Skills.*—(1) Ability to anticipate issues and problems and prepare advance strategic plans ;

(2) Ability to generate resources and allocate the same appropriately;

(3) Capacity to work effectively under pressure and manage work and resources within tight deadlines ;

(4) Good understanding of financial management including revenue generation, planning and fiscal control.

3. *Alignment with corporate objectives and State as well as National level priorities.*—(1) Ability to identify the needs of the communities in key sectors ;

(2) Deep understanding of the challenges before the Nations and how higher education can respond to developmental needs ;

(3) Demonstrable understanding of curriculum development issues, especially those relating to widening participation and social inclusion.

4. *Leadership Skills.*—(1) Exceptional ability to motivate a divers group of stakeholders ;

(2) Keen desire to further the mission and goals of the organisation;

(3) Ability to think strategically and innovatively and maintain a broad perspective ;

(4) Ability to lead by personal example with openness to new ideas and a consultative approach in implementation of the same.

5. *Interpersonal Communication and Collaborative Skills.*—(1) Demonstrable success in developing and executing National and International collaborative arrangements ;

(2) Ability to interact effectively and persuasively with a strong knowledge- base at senior levels and in large forums as well as on a one-to-one basis ;

(3) Evidence of being an active member of professional bodies and association in pertinent fields.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

N. B. PATIL,
Additional Chief Secretary
to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A,NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

C/13
08 2011 01:19 FAX

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र
# असाधारण भाग चार-ब

वर्ष ३, अंक ५५] शुक्रवार, जुलै ८, २०११/आषाढ १८, शके १९३३ [पृष्ठे ४
किंमत : रुपये १२.००

असाधारण क्रमांक १०५

## प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ५ जुलै २०११

### आदेश

**महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३.**

क्रमांक एजीयू. २०१०/प्र.क्र.७१/७-ए.—ज्याअर्थी महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ (१९८३ चा महा. ४१) याच्या कलम १७ च्या पोट-कलम (२क) च्या खंड (ड) द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, काढलेला शासकीय आदेश, कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, क्र. एजीयू. २०१०/प्र.क्र. ७१/७-ए, दिनांक २१ जुलै २०१० याद्वारे, महाराष्ट्र शासनाने, कुलगुरु म्हणून नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तीने धारण करावयाची शैक्षणिक अर्हता व अनुभव विनिर्दिष्ट केला आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाला, आता, कुलगुरु म्हणून नियुक्त केल्या जाणाऱ्या व्यक्तीने धारण करावयाची सुधारित शैक्षणिक अर्हता व अनुभव विनिर्दिष्ट करणाऱ्या पात्रता अटींमध्ये फेरबदल करणे इष्ट वाटते.

त्याअर्थी, आता, महाराष्ट्र कृषि विद्यापीठ अधिनियम, १९८३ (१९८३ चा महा. ४१) याच्या कलम १७ च्या पोट-कलम (२क) च्या खंड (ड) आणि मुंबईचा सर्वसाधारण वाक्खंड, अधिनियम, १९०४ (१९०४ चा मुंबई १) यांच्या कलम २१ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या इतर



001

C/15

003



सर्व अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, कुलपतींशी विचारविनिमय करून, याद्वारे उक्त आदेशात पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

उक्त आदेशामध्ये, उक्त आदेशाला जोडलेल्या अनुसूचीमधील,—

(क) भाग ' अ ' मध्ये,—

(एक) परिच्छेद २ व ३ याऐवजी पुढील परिच्छेद दाखल करण्यात येतील :—

" २. कृषि क्षेत्रातील किंवा संबंधित क्षेत्रांतील अध्यापन, संशोधन व विस्तार शिक्षण यामधील २० वर्षांचा अनुभव, यापैकी किमान ८ वर्षांचा अनुभव, प्राध्यापक किंवा समकक्ष पदावरील असावा.

३. विभाग प्रमुख किंवा समकक्ष पदापेक्षा कमी दर्जा नसलेल्या पदावरील किमान ८ वर्षांचा प्रशासकीय अनुभव, यापैकी किमान ५ वर्षांचा अनुभव, अधिष्ठाता किंवा संचालक किंवा समकक्ष पदावरील असावा."

(दोन) परिच्छेद ५ ते ८ याऐवजी पुढील परिच्छेद दाखल करण्यात येतील :—

" ५. महत्त्वपूर्ण अशा किमान एका संशोधन प्रकल्पाचे किंवा बहुविध-ज्ञानशाखा पुरस्कृत संशोधन प्रकल्पाचे संचलन केलेले असावे.

६. आंतरराष्ट्रीय संस्था किंवा संघटना यांच्या देशाबाहेर घेतलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागात्मक स्वरुपाच्या कार्याचा अनुभव असावा."

(ख) भाग ' ब ' मध्ये परिच्छेद (१) ते (४) याऐवजी पुढील परिच्छेद दाखल करता येतील :—

" १. विद्यापीठाच्या किंवा भारतीय कृषि संशोधन परिषद, नवी दिल्ली यांच्या सांविधिक प्राधिकरणांवरील कार्याचा अनुभव असावा.

२. विद्याविषयक मूल्यनिर्धारण व अधिस्वीकृती प्रक्रिया इत्यादी बाबी हाताळण्याचा प्रत्यक्ष अनुभव असावा.

३. पी.एच.डी. करणाऱ्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा अनुभव असावा.

४. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यार्थी केंद्रित कार्यक्रमाचे आयोजन करणे यासारखे युवक विकासाचे काम करण्याचा अनुभव असावा.

५. कृषि क्षेत्राशी संबंधित आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कार्यशाळा, चर्चासत्रे, परिषदा यांचे देशात आयोजन करण्याचा अनुभव असावा.

टिपा.—(एक) विहित केलेली आवश्यक अर्हता ही किमान अर्हता असून केवळ ती अर्हता धारण केल्याने, उमेदवार वैयक्तिक विचारविनिमय करण्यासाठी बोलावले जाण्यास हक्कदार नाहीत.

(दोन) शोध समिती, वैयक्तिक विचार विनिमयाकरिता उमेदवारांची संख्या कमी करण्याच्या दृष्टीने, उच्च दर्जाची, आवश्यक अर्हता व अनुभव विहित करण्याचा अधिकार राखून ठेवत आहे."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

डॉ. सुधीरकुमार गोयल,
शासनाचे प्रधान सचिव.

04/08 2011 01:20 FAX

C/17



## AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT

Mantralaya, Mumbai 400 032, dated the 5th July 2011

### Order

MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES (KRISHI VIDYAPEETHS) ACT, 1983.

No. AGU. 2010/CR-71/7-A.—Whereas by Government Order, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department No. AGU. 2010/CR-71/7-A, dated 21st July 2010, issued in exercise of the powers conferred by clause *(b)* of sub-section (*2C*) of section 17 of the Maharashtra Agriculture Universities (Krishi Vidyapeeths) Act, 1983 (Mah. XLI of 1983), the Government of Maharashtra has specified the educational qualification and experience to be possessed by a person for the appointment as Vice-Chancellor ;

And whereas, the Government of Maharashtra now desires to modify the eligibility conditions by specifying the modified educational qualifications and experience to be possessed by a person for the appointment as a Vice-Chancellor.

Now, therefore, in exercise of the powers conferred by clause (*d*) of sub-section (*2C*) of section 17 of the Maharashtra Agriculture Universities (Krishi Vidyapeeths) Act, 1983 (Mah. XLI of 1983), read with section 21 of the Bombay General Clause Act, 1904 (Bom. I of 1904) and of all other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, in consultation with the Chancellor, hereby amends the said Order as follows, namely :—

In the said Order, in the Schedule appended to the said Order,—

(A) In Part 'A',—

(*i*) for paragraphs 2 and 3, the following paragraphs shall be substituted, namely :—

"2. Experience of 20 years in teaching, research and extension education in Agriculture or related fields, out which atleast 8 years should be in the rank of Professor or equivalent.

3. Atleast 8 years of administrative experience not below the rank of Head of the Department or equivalent post out of which atleast 5 years should be at the level of Dean or Director or equivalent."

(*ii*) for paragraphs 5 and 8, the following para shall be substituted, namely :—

"5. Execution of atleast one major research project or sponsored multi-disciplinary research project.

6. Experience of working with international bodies or international exposure through participation in training programmes held outside the country. "

(B) In Part 'B', for paragraphs (1) to (4), the following para shall be substituted, namely :—

"1. Experience of working on the Statutory Authorities of a University or Indian Council of Agricultural Research (ICAR), New Delhi.

2. Demonstrable Experience of handling academic assessment and accreditation procedures, etc.

3. Experience to guide Ph.D. students.

4. Experience in handling youth development work such as organising student centric activities for their all-round development.

5. Experience of organizing events such as workshops, seminars, conference at an international level within the country in the field of agriculture.

*Notes.*—(*i*) The prescribed essential qualifications are the minimum and the mere possession of the same does not entitle candidates to be called for personal interaction.

(*ii*) The Search Committee reserves the right to prescribe higher standards in essential qualifications and experience while short-listing of the candidates for personal interaction.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DR. SUDHIRKUMAR GOEL,
Principal Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष १, अंक ७२] मंगळवार, जुलै ७, २०१५/आषाढ १६, शके १९३७ [पृष्ठे २, किंमत : रुपये ९.००

असाधारण क्रमांक १६७

प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले
(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

**AGRICULTURE, ANIMAL HUSBANDRY, DAIRY DEVELOPMENT AND FISHERIES DEPARTMENT**

Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated the 6th July 2015

**Order**

MAHARASHTRA GENERAL CLAUSES ACT.
MAHARASHTRA AGRICULTURAL UNIVERSITIES (KRISHI VIDYAPEETHS) ACT, 1983.

No. KOKRUVI. 1115/C.R. No. 124/7A.—Whereas by Government Order, Agriculture, Animal Husbandry, Dairy Development and Fisheries Department No. AGU.2010/C.R. 71/7-A, dated the 21st July 2010 (hereinafter referred to as " the said Order "), issued in exercise of the powers conferred by clause (*d*) of sub-section (*2C*) of section 17 of the Maharashtra Agricultural Universities (Krishi Vidyapeeths) Act, 1983 (Mah. XLI of 1983), the Government of Maharashtra has, in consultation with the Chancellor, specified the educational qualifications and experience to be possessed by a person for the appointment as Vice-Chancellor ;

And whereas, the Government of Maharashtra considers it expedient to modify the eligibility conditions by specifying the specific experience to be possessed by a person for appointment as Vice-Chancellor ;

Now, therefore in exercise of the powers conferred by the clause (*d*) of sub-section (*2C*) of section 17 of the Maharashtra Agricultural Universities (Krishi Vidyapeeths) Act, 1983 (Mah. XLI of 1983) read with section 21 of the Bombay General Clauses Act (I of 1904) and all

other powers enabling it in that behalf, the Government of Maharashtra, in consultation with the Chancellor, hereby amends the said Order as follows, namely :—

In the said order, in the Schedule appended thereto, in Part 'A', for paragraph 3 the following shall be substituted, namely :—

"atleast five years of Administrative experience, not below the rank of head of the Department or equivalent posts ".

By order and in the name of the Governor of Maharashtra,

DINESHKUMAR JAIN,
Additional Chief Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.